महाराष्ट्र शासन
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,
बहिरट पाटील चौक, शिवाजी नगर, पुणे - ४११ ०१६
दूरध्वनी क्रमांक (०२०) २५६५६२२४, Web : www.ropune.org.in Email : ropune@dtemaharashtra.gov.in

जा.क्र.तंशिविकापु/आस्था-२अ/परिपत्रक/२०२३/४६६० दिनांक : 06 OCT 2023

**परिपत्रक :-**

**विषय:-तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील राज्यातील सार्वजनिक विद्यापीठशी संलग्नीत व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या विनाअनुदानित संस्थांमधील अध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांचेकडून सेवाविषयक व इतर बाबीं संदर्भात प्राप्त होणा-या तक्रारीबाबत......**

संदर्भ :-तंत्रशिक्षण संचालनालयाचे परिपत्रक्र.२/एनजीसी/तक्रार-परिपत्रक/२०२३/८७० दि.२६.०९.२०२३

संदर्भिय विषयाच्या अनुषंगाने परिपत्रकाचे अवलोकन करावे, तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील राज्यातील सार्वजनिक विद्यापीठांशी संलग्नीत असलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या विनाअनुदानित शैक्षणिक संस्थेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचेकडून सेवा विषयक बाबी व इतर संदर्भात संचालनालयास व या विभागीय कार्यालयास तक्रारी प्राप्त होतात. या तक्रारी साधारणत: वेतन न मिळणे, वेतन कमी मिळणे, उपदान व रजारोखीकरण रक्कम न मिळणे, सेवापुस्तक, वेतन चिठ्ठी न मिळणे, आयकर प्रमाणपत्र न मिळणे, वरिष्ठांकडून त्रास, नोकरीतून काढून टाकणे इत्यादी स्वरूपाच्या असतात. या संदर्भात संस्थेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या सेवा विषयक सर्व तक्रारी विद्यापीठाच्या संलग्नीत प्राधिकरणाकडे व संस्था स्तरावरील तक्रार निवारण समितीकडे दाखल करण्याबाबतचे परिपत्रक या सोबत जोडण्यात येत आहे.

सदर परिपत्रक पुणे विभागातील व्यावसायिक विनाअनुदानित पदवी व पदव्युत्तर पदवी अभियांत्रिकी , औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र, एचएमसीटी, एमबीए, एमसीए, डिझाईन या अभ्यासक्रमांच्या सर्व संस्था व संस्थेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या निदर्शनास आणावे.

सोबत:- वरील प्रमाणे.

(डॉ.दत्तात्रय व्यं.जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
पुणे

प्रति,

संस्था प्रमुख,
या कार्यालयाच्या अधिनस्त
सर्व विनाअनुदानित पदवी व पदव्युत्तर पदवी अभियांत्रिकी संस्था.

प्रत : या कार्यालयातील प्रोग्रॅमर यांना सदरचे परिपत्रक या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करणेसाठी.

महाराष्ट्र शासन
# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४५०, ४४२, ४४३
ई-मेल — desk2@dtemaharashtra.gov.in वेबसाईट : http://www.dtemaharashtra.gov.in

## परिपत्रक

क्र. २/एनजीसी/तक्रार-परिपत्रक/२०२३/ ८७० दिनांक : 26 SEP 2023

विषय : तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील राज्यातील सार्वजनिक विद्यापीठाशी संलग्नीत व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या विनाअनुदानित संस्थांमधील अध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचेकडून सेवाविषयक व इतर बाबींसंदर्भात प्राप्त होणा-या तक्रारींबाबत...

संदर्भ : १) ऑल इंडिया कौंसिल ऑफ टेक्नीकल एज्युकेशन (रिड्रेसल ऑफ फॅकल्टी / स्टाफ मेंबर) रेग्युलेशन, २०२१
२) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६
३) या संचालनालयाचे पत्र क्र. २/एनजीसी/तक्रार निवारण समिती/२०२३/७९७, दि. ०५.०९.२०२३

तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील राज्यातील सार्वजनिक विद्यापीठांशी संलग्नीत असलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या विनाअनुदानित शैक्षणिक संस्थेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचेकडून सेवा विषयक बाबी व इतर संदर्भात या संचालनालयास तक्रारी प्राप्त होतात. या तक्रारी साधारणत: वेतन न मिळणे, वेतन कमी मिळणे, उपदान व रजारोखीकरण रक्कम न मिळणे, सेवापुस्तक, वेतन चिठ्ठी न मिळणे, आयकर प्रमाणपत्र न मिळणे, वरिष्ठांकडून त्रास, नोकरीतून काढून टाकणे इत्यादी स्वरुपाच्या असतात. अशा स्वरुपाच्या प्राप्त तक्रारी, तसेच शासन तथा इतर प्राधिकरणांकडून प्राप्त तक्रारी संचालनालयाकडून विद्यापीठास पुढील उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित करण्यात येतात.

शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे आणि संस्थेतील व्यवस्थापन यांच्यामधील विवादांच्या अभिनिर्णयासाठी अथवा सेवासंबंधिची गाऱ्हाणी किंवा तक्रारी यांचे निवारणासाठी संदर्भीन अधिनियमांमध्ये खालील प्रमाणे तरतूदी आहेत.

- AICTE च्या (Redressal of Grievance of Faculty/Staff Member) Regulation, २०२१, नुसार विनाअनुदानित तत्वावर सुरु असलेल्या महाविद्यालयामध्ये तक्रार निवारण समिती गठित करणे आवश्यक आहे. सदर तक्रार निवारण समितीकडे संबंधित महाविद्यालयातील कार्यरत असलेल्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना दाद मागण्याची तरतूद आहे.

- महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ७९ नुसार, प्रत्येक विद्यापीठामध्ये राज्य शासन, केंद्र सरकार किंवा स्थानिक प्राधिकरण यांनी व्यवस्थापन केलेल्या व चालविलेल्या संस्थेव्यतिरिक्त विद्यापीठाचे संलग्न महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त संस्थाचे अध्यापक व इतर कर्मचारी यांच्या राज्य शासन व त्यांच्या अधिकारी यांचे विरुध्दच्या तक्रारीं व्यतिरिक्त, इतर सर्व प्रकारच्या आणि विद्यापीठाच्या व महाविद्यालय न्यायाधिकरणाच्या अधिकार क्षेत्रात येत नाहीत, अशा तक्रारीवर निर्णय देण्यासाठी प्रत्येक विद्यापीठामध्ये तक्रार निवारण समिती अस्तित्वात आहे.

- महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ८१ नुसार, राज्य शासनाकडून, केंद्र सरकारकडून किंवा स्थानिक प्राधिकरणाकडून व्यवस्थापन करण्यात आलेल्या किंवा चालविण्यात येणारी महाविद्यालये आणि संस्था वगळून, विद्यापीठ किंवा विद्यापीठाच्या संलग्न महाविद्यालयातील किंवा मान्यताप्राप्त संस्थेतील अध्यापक तसेच इतर कर्मचारी यांना विद्यापीठाने किंवा व्यवस्थापनाने बडतर्फ केले असेल, पदावरुन काढून टाकले असेल, सेवा समाप्त केली असेल, सक्तीने सेवानिवृत्त केले असेल किंवा पदानवत केले असेल तर त्यांना विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरण येथे अपिल दाखल करुन सदर आदेशाविरुध्द दाद मागता येते.

शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी त्यांच्या तक्रारी संदर्भीन अधिनियम / परिनियम यांमध्ये नमूद केलेल्या प्राधिकरणांकडे तक्रारी केल्यास त्यांचे तक्रार अर्जावर उचित कार्यवाही त्वरीत होईल. मात्र त्यांनी त्यांच्या तक्रारी या संचालनालयाकडे अथवा अन्य प्राधिका-यांकडे केल्यास सदर तक्रारी या संचालनालयाकडून विद्यापीठाकडे पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित केल्या जातात. परिणामी पत्रव्यवहारामध्ये कालापव्यय होऊन संबंधित तक्रारदाराच्या तक्रारीवर विलंबाने कार्यवाही होते. करीता, या परिपत्रकान्वये या संचालनालयाच्या अधिपत्याखालील व सार्वजनिक विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये /मान्यता प्राप्त विनाअनुदानित संस्थातील अध्यापक आणि इतर कर्मचाऱ्यांनी खालील तक्त्यांमध्ये दर्शविल्याप्रमाणे त्यांच्या तक्रार निवारणासाठी संबंधित प्राधिकरणाकडे दाद मागावी.

| अ.क्र. | तक्रारीचे स्वरुप | दाद मागण्यासाठीचे प्राधिकरण |
|---|---|---|
| १. | व्यावसायिक अभ्याक्रम चालविणाऱ्या महाविद्यालये/मान्यता प्राप्त विनाअनुदानित संस्थातील अध्यापक व इतर कर्मचारी यांच्या सेवाविषयक बाबी, वेतन न मिळणे, वेतन कमी मिळणे, उपदान व रजारोखीकरण रक्कम न मिळणे, सेवापुस्तक, वेतन चिठ्ठी न मिळणे, आयकर प्रमाणपत्र न मिळणे, वरिष्ठांकडून त्रास, सेवासमाप्ती तथा नोकरीतून काढून टाकणे, सक्तीने सेवानिवृत्ती इ. तक्रारी | AICTE (Redressal of Grievance of Faculty/Staff Members) Regulation २०२१ अन्वये गठित संबंधित महाविद्यालय / मान्यता प्राप्त संस्थांच्या स्तरावर गठित केलेली तक्रार निवारण समिती |
| २. | विनाअनुदानित महाविद्यालयातील अध्यापक व इतर कर्मचारी यांच्या राज्यशासन व त्यांचे अधिकारी व त्यांचे विरुध्दच्या तक्रारी व्यतिरिक्त इतर सर्व प्रकाराच्या तक्रारी ( व्यवस्थापनाने बडतर्फ केले असेल किंवा पदावरुन काढून टाकले असेल किंवा अन्यथा सेवा समाप्त केली असेल किंवा सक्तीने सेवा निवृत्त केले असेल किंवा पदावनत केले असेल या खेरीज करुन इतर सर्व तक्रारी) | महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम, ७९ नुसार विद्यापीठ स्तरावरील गठित केलेली तक्रार निवारण समिती. |
| ३ | विनाअनुदानित महाविद्यालयातील अध्यापक व इतर कर्मचारी आणि संबंधित व्यवस्थापन यांच्यामधील विवादांच्या अभिनिर्णयासाठी (व्यवस्थापनाने बडतर्फ केले असेल किंवा पदावरुन काढून टाकले असेल किंवा अन्यथा सेवा समाप्त केली असेल किंवा सक्तीने सेवानिवृत्त केले असेल किंवा पदानवत केले असेल) अशा विवादांच्या अभिनिर्णयासाठी तसेच महाविद्यालयातील तक्रार निवारण समितीच्या निर्णयाने व्यथित झाला असेल याकरिता. | महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम, ८० नुसार विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरण |

संदर्भीन अधिनियम / अधिसूचनेतील तरतूदी व उपरोक्त वस्तूस्थिती विचारात घेता अकृषी विद्यापीठाशी संलग्नीत असलेल्या या संचालनालयाच्या अधिपत्याखालील पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या विनाअनुदानित शैक्षणिक संस्थेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी त्यांच्या तक्रारीबाबत खालील प्रमाणे कार्यवाही करणे अपेक्षित आहे.

१. सेवाविषयक बाबी, वेतन न मिळणे, वेतन कमी मिळणे, उपदान व रजारोखीकरण रक्कम न मिळणे, सेवापुस्तक, वेतन चिठ्ठी न मिळणे, आयकर प्रमाणपत्र न मिळणे, वरिष्ठांकडून त्रास, सेवासमाप्ती तथा नोकरीतून काढून टाकणे, सक्तीने सेवानिवृत्ती इ. बाबींबाबत तक्रारदार शिक्षकीय व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी **शैक्षणिक संस्थेच्या स्तरावरील तक्रार निवारण समितीकडे** दाद मागावी अथवा तक्रार करावी.

२. शैक्षणिक संस्था स्तरावरील तक्रार निवारण समितीने संबंधित शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे तक्रारीवर उचित कार्यवाही करुन त्यांच्या तक्रारीचे निराकरण करावे व तसा लेखी निर्णय / आदेश पारित करावा. पारीत केलेल्या निर्णयावर संबंधित तक्रारदार शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे **समाधान न झाल्यास त्यांनी शैक्षणिक संस्था संलग्नीत असलेल्या विद्यापीठ तक्रार निवारण समितीकडे दाद मागावी किंवा तक्रार करावी.**

३. तक्रारदार अध्यापक व कर्मचारी यांचे विद्यापीठ स्तरावरील तक्रार निवारण समितीमार्फत उचित कार्यवाही होऊन पारित केलेल्या निर्णयाबाबत समाधान न झाल्यास, तसेच तक्रारदार महाविद्यालयीन तक्रार निवारण समितीच्या निर्णयाने व्यथित झाला असल्यास त्यांनी विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरणाकडे अपिल करण्यात यावे.

उपरोक्त नमूद केल्यानुसार अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद (रिड्रेसल ऑफ फॅकल्टी / स्टाफ मेंबर) रेग्युलेशन, २०२१, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियमातील नमूद तरतुदीस अनुसरुन विद्यापीठ व विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये तसेच मान्यताप्राप्त परिसंस्था यामधील अध्यापक व इतर कर्मचारी यांना त्यांच्या व्यक्तिगत स्वरुपाच्या तक्रारीबाबत, त्या तक्रारीसंबंधीचे अधिकारक्षेत्र विचारात घेऊन संस्था स्तरावरील तक्रार निवारण समिती, विद्यापीठ स्तरावरील तक्रार निवारण समिती व विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरण यांच्याकडे दाद मागण्यात यावी. तसेच यापुढे उपरोक्त नमूद आशयाच्या वैयक्तीक स्वरुपाच्या तक्रारी संचालनालयास प्राप्त झाल्यास त्यावर संचालनालयामार्फत कोणतीही कार्यवाही केली जाणार नाही याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

(डॉ. विनोद मोहितकर)
संचालक,
तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत, मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ यांना माहितीसाठी सादर

प्रत माहिती व पुढील उचित कार्यवाहीसाठी :

१) कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य
२) सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर
   त्यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक त्यांचे कार्यक्षेत्रात येणा-या या संचालनालयाच्या नियंत्रणखालील सर्व विनाअनुदानित संस्थाना अग्रेषित करण्यात यावे. तसेच संबंधित संस्थांना सदर परिपत्रक संबंधित संस्थेतील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांच्या निदर्शनास आणण्याच्या सूचना आपल्या स्तरावरुन देण्यात याव्यात.
३) सर्व प्राचार्य / संचालक, विनाअनुदानित पदवी व पदव्युत्तर पदवी अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र, एचएमसीटी, एमबीए, एमसीए, डिझाईन या अभ्यासक्रमाच्या विनाअनुदानित संस्था
   त्यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक त्यांचे संस्थेतील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे निदर्शनास आणून सूचना फलकावर लावण्यात यावे.
४) कार्यासन क्रमांक २, निवड नस्तीस

E:\Vijay\AFFILATION\University Cercular Final.Docx

रजिस्ट्री सं. डी.एल.- 33004/99

REGD. No. D. L.-33004/99

भारत का राजपत्र
The Gazette of India

सी.जी.-डी.एल.-अ.-25032021-226122
CG-DL-E-25032021-226122

असाधारण
EXTRAORDINARY

भाग III—खण्ड 4
PART III—Section 4

प्राधिकार से प्रकाशित
PUBLISHED BY AUTHORITY

सं. 119] नई दिल्ली, बृहस्पतिवार, मार्च 25, 2021/चैत्र 4, 1943
No. 119] NEW DELHI, THURSDAY, MARCH 25, 2021/CHAITRA 4, 1943

अखिल भारतीय तकनीकी शिक्षा परिषद्

अधिसूचना

नई दिल्ली, 22 मार्च, 2021

फा. सं. 1–103/अभातशिप/पीजीआरसी/विनियम/2021.—अखिल भारतीय तकनीकी शिक्षा परिषद् अधिनियम, 1987 (1987 का 52) की धारा 23 की उपधारा (1) के अंतर्गत प्रदत्त अपनी शक्तियों का प्रयोग करते हुए अखिल भारतीय तकनीकी शिक्षा परिषद् निम्नलिखित विनियम बनाती है, यथा :–

1. संक्षिप्त नाम, प्रयोज्यता और प्रारंभ :

   क. इन विनियमों का नाम अखिल भारतीय तकनीकी शिक्षा परिषद् (संकाय/स्टॉफ सदस्यों की शिकायतों का निवारण) विनियम, 2021 है।

   ख. ये विनियम अखिल भारतीय तकनीकी शिक्षा परिषद् अधिनियम, 1987 की धारा 10(ट) के अधीन, अखिल भारतीय तकनीकी शिक्षा परिषद् द्वारा मान्यता प्रदान की गई अथवा अनुमोदित की गई सभी तकनीकी संस्थाओं पर लागू होंगे।

   ग. ये राजपत्र में इनके प्रकाशन की तारीख से प्रवृत्त होंगे।

2. उद्देश्य :

   किसी भी संस्था में पहले से नियुक्त और साथ ही ऐसे संस्थान में नियुक्ति पाने की आकांक्षा रखने वाले संकाय/स्टॉफ सदस्यों की कतिपय शिकायतों के निवारण के लिए अवसर प्रदान करना, इस संबंध में एक तंत्र स्थापित करना।

3. परिभाषा : इन विनियमों में जब तक कि संदर्भ से अन्यथा अपेक्षित न हो :–

   (क) "अधिनियम" से अखिल भारतीय तकनीकी शिक्षा परिषद् अधिनियम, 1987 अभिप्रेत है ;

   (ख) "परिषद्" से अखिल भारतीय तकनीकी शिक्षा परिषद् अभिप्रेत है ;

   (ग) "यूजीसी" से विश्वविद्यालय अनुदान आयोग अभिप्रेत है ;

(घ) "विश्वविद्यालय" से अभिप्रेत केन्द्रीय अधिनियम अथवा राज्य अधिनियम द्वारा अथवा इसके अंतर्गत स्थापित अथवा शामिल संस्थाएं हैं तथा जिसमें यूजीसी अधिनियम 1956 के खण्ड 3 के अंतर्गत घोषित की गई मानित विश्वविद्यालय संस्थाएं भी शामिल हैं।

(ड़) "राज्य" का अभिप्राय संविधान की प्रथम अनुसूची में विनिर्दिष्ट किसी राज्य से है जिसमें संघ राज्य क्षेत्र भी शामिल हैं ;

(च) "तकनीकी शिक्षा" से अभिप्रेत, अखिल भारतीय तकनीकी शिक्षा परिषद् अधिनियम, 1987 की धारा 2(छ) के अंतर्गत परिभाषित शिक्षा कार्यक्रमों से है।

(छ) "तकनीकी संस्था" से अभिप्रेत अखिल भारतीय तकनीकी शिक्षा परिषद् अधिनियम 1987 की धारा 2(ज) के अंतर्गत परिभाषित संस्था से है।

(ज) "पीड़ित संकाय/स्टॉफ सदस्य" से अभिप्रेत किसी ऐसे संकाय/स्टॉफ सदस्य से है, जिसे इन विनियमों के तहत परिभाषित शिकायतों के संबंध में किसी मामले अथवा तत्संबंधी किसी मामले में कोई शिकायत हो।

(झ) "शिकायत" का अभिप्राय, और इसमें निम्नवत् के संबंध में किसी पीड़ित संकाय/स्टॉफ सदस्य(यों) द्वारा की गई शिकायत(तें) शामिल हैं, नामत :–

i. किसी संकाय/स्टॉफ सदस्य द्वारा ऐसे संस्थान में नियुक्ति लेने के प्रयोजन से जमा किए गए अपने किसी दस्तावेज जोकि डिग्री प्रमाणपत्र, डिप्लोमा, अनुभव प्रमाणपत्र, कार्यमुक्ति आदेश अथवा किसी अन्य पुरस्कार के प्रमाणपत्र के रूप में अथवा अन्य दस्तावेज हों, को अपने पास रख लेना, या वापस करने से इंकार करना ;

ii. सेवारत् होने या सेवानिवृत्ति/त्यागपत्र जैसा भी मामला हो, के दौरान वेतन/मजदूरी और/अथवा लाभ या किसी भी अन्य भत्ते या देय राशि आदि का भुगतान न करना ;

iii. उनके वेतन और/अथवा लाभ तथा समान वेतन/पदनाम/अनुभव में अन्य स्टॉफ कर्मचारियों के बीच विसंगतियां ;

iv. कोई कारण अथवा नोटिस अथवा ज्ञापन दिए बिना सेवा–समाप्ति ;

v. त्यागपत्र/सेवानिवृत्ति पर लागू, सरकार के नियमों के अनुसार अधिवर्षिता राशि का भुगतान न करना ; तथा

vi. कोई अन्य देयता जो उनकी सेवा से सीधे जुड़ी हुई है और वित्तीय हानि या किसी नुकसान या आघात का कारण बनती है।

(ञ) शिकायत निवारण समिति" (जीआरसी) से अभिप्राय इन विनियमों के तहत गठित किसी समिति से है।

4. शिकायत निवारण समिति (जीआरसी) :

(i) सभी तकनीकी संस्थानों के लिए अनिवार्य है कि वे संस्थान स्तर पर ही सेवा मामलों सहित संकाय/स्टॉफ सदस्यों की शिकायत का समाधान करें। प्रत्येक संस्था द्वारा संकाय/स्टॉफ सदस्यों की शिकायत को देखने के लिए संकाय/स्टॉफ सदस्यों हेतु एक शिकायत निवारण समिति गठित की जाएगी। शिकायत निवारण समिति का संघटन निम्नानुसार होगा :–

क. संस्थान के प्राचार्य – अध्यक्ष

ख. संबद्धता प्रदान करने वाले विश्वविद्यालय का एक वरिष्ठ प्रोफेसर – सदस्य के रूप में,

ग. राज्य के तकनीकी शिक्षा निदेशालय अथवा विश्वविद्यालय से एक कार्मिक (जिसे राज्य के तकनीकी शिक्षा निदेशक/विश्वविद्यालय के कुलपति द्वारा नामांकित किया जाएगा) – सदस्य,

घ. एक वरिष्ठ संकाय सदस्य (जोकि एसोसिएट प्रोफेसर से नीचे के रैंक का ना हो) – सदस्य के रूप में।

(ii) पीड़ित संकाय/स्टॉफ सदस्यों द्वारा संस्थान के संबंध में की जाने वाली शिकायत, अध्यक्ष, शिकायत निवारण समिति (जीआरसी) को संबोधित होनी चाहिए।

(iii) जीआरसी अपनी रिपोर्ट को अपनी सिफारिशों सहित, यदि कोई हों तो, के साथ शिकायत प्राप्ति की तिथि से 15 दिनों की अवधि के भीतर संबंधित राज्य के तकनीकी शिक्षा निदेशक अथवा विश्वविद्यालय को भेजेगी तथा इसकी एक प्रति पीड़ित संकाय/स्टॉफ सदस्य को भी भेजी जाएगी।

(iv) यदि संकाय/स्टॉफ सदस्य शिकायत निवारण समिति के निर्णय से संतुष्ट नहीं है, तो वे संबंधित संबद्ध विश्वविद्यालय/राज्य के तकनीकी शिक्षा निदेशालय से अपनी शिकायतों के निवारण के लिए अपील कर सकते हैं।

5. विश्वविद्यालय अथवा तकनीकी शिक्षा निदेशालय द्वारा विश्वविद्यालय स्तर पर अथवा तकनीकी शिक्षा निदेशालय (डीटीई) स्तर पर गठित शिकायत निवारण प्रकोष्ठ ऐसी शिकायतों को देखेगा तथा मामले को राज्य/विश्वविद्यालय स्तर पर सुलझाएगा।

6. शिकायत निवारण समिति के बारे में जानकारी :

संस्था को शिकायत निवारण समिति के संबंध में सभी प्रासंगिक जानकारी जोकि इसके दायरे में आती हैं, को संस्था की वेबसाईट पर प्रमुख्ता से प्रस्तुत करना होगा।

प्रो. राजीव कुमार, सदस्य–सचिव

[विज्ञापन–III/4/असा./558/2020–21]

## ALL INDIA COUNCIL FOR TECHNICAL EDUCATION

## NOTIFICATION

New Delhi, the 22nd March, 2021

**F. No. 1-103/AICTE/PGRC/Regulation/2021.**—In exercise of the power conferred under clause (1) of Section 23 of the All India Council for Technical Education, Act, 1987 (52 of 1987), the All India Council for Technical Education makes the following Regulations, namely:

1. **SHORT TITLE, APPLICATION AND COMMENCEMENT:**
   a. These Regulations shall be called as the **All India Council for Technical Education (Redressal of Grievance of Faculty/Staff Member) Regulations, 2021**.
   b. They shall apply to all Technical Institutions recognized or approved by the All India Council for Technical Education as per Section 10(k) of the All India Council for Technical Education Act, 1987.
   c. They shall come into force from the date of their publication in the Official Gazette.
2. **OBJECTIVE:**

   To provide opportunities for redressal of certain grievances of Faculty/Staff Members already appointed in any institution, as well as those seeking appointment to such institutions, and a mechanism thereto.
3. **DEFINITION: IN THESE REGULATIONS, UNLESS THE CONTEXT OTHERWISE REQUIRES:**
   (a) "Act" means the All India Council for Technical Education Act, 1987;

   (b) "Council" means the All India Council for Technical Education

   (c) "UGC" means University Grants Commission

   (d) "University" means a university established or incorporated by or under a Central Act or State Act and includes an institution deemed to be university declared as such under section 3 of the UGC Act, 1956.

   (e) "State" means a State specified in the First Schedule to the Constitution of India and includes a Union territory;

   (f) "Technical Education" means programs of education as defined under section 2(g) of the All India Council for Technical Education, Act, 1987;

   (g) "Technical Institution" means an Institution as defined under section 2(h) of the All India Council for Technical Education, Act, 1987;

   (h) "aggrieved Faculty/Staff Member" means a Faculty & Staff Member, who has any complaint in the matters relating to or connected with the grievances defined under these Regulations.

   (i) "Grievance" means and includes, complaint(s) made by an aggrieved Faculty/Staff Member(s) in respect of the following service related matters namely:

      i. withholding of, or refusal to return, any document in the form of certificates of degree, diploma, experience certificate, relieving order or any other award or other document deposited for the purpose of seeking appointment in such institution;

      ii. non-payment of salaries/wages and/or benefits or any other allowances or dues etc. during services or retirement/resignation, as the case may be;

      iii. Discrepancies between their wages and/or benefits and other members of staff in similar roles/post/experience.

      iv. termination without giving any reason or notice or memorandum;

      v. non-payment of gratuity amount as per prevailing Govt. rules in force on resignation/ retirement; and

vi. any other liability which is directly connected with their service and causing financial loss or any harm or trauma.

(j) "Grievance Redressal Committee" means a Committee constituted under these Regulations;

4. **GRIEVANCE REDRESSAL COMMITTEE (GRC):**

(i) It is mandatory for all Technical Institutions to address the grievance of faculty/staff members including service matters at the Institution level itself. A Grievance Redressal Committee (GRC) for faculty/staff members shall be constituted by each Institution to look into the grievance of the faculty/staff members. The composition of the GRC shall be as follows:

a. Principal of the Institution as Chairperson

b. One Senior Professor of the affiliating University as a Member,

c. One Official from University or State DTE (Directorate of Technical Education) (to be nominated by DTE/University Vice Chancellor) as Member,

d. One Senior Faculty (not below Associate Professor) as Member.

(ii) A complaint from an aggrieved faculty/staff member relating to the institution shall be addressed to the Chairperson, Grievance Redressal Committee (GRC).

(iii) The GRC shall send its report with recommendations, if any, to the concerned DTE or University and a copy thereof to the aggrieved faculty/staff member, within a period of 15 days from the date of receipt of the complaint.

(iv) In case faculty/staff is not satisfied with the decision of Grievance Redressal Committee, they may appeal to the concerned affiliating University/State DTE (in case of diploma institutes) for redressal of their grievances.

5. The University level or DTE level Grievance Redressal Cell established by the University or DTE shall address such grievances and settle the matter at State/University level.

6. **INFORMATION REGARDING GRIEVANCE REDRESSAL COMMITTEE:**

An institution shall furnish, prominently, on its website, all relevant information in respect of the Grievance Redressal Committee(s) coming in its purview.

Prof. RAJIVE KUMAR, Member-Secy.

[ADVT.-III/4/Exty./558/2020-21]

Uploaded by Dte. of Printing at Government of India Press, Ring Road, Mayapuri, New Delhi-110064
and Published by the Controller of Publications, Delhi-110054. ALOK KUMAR Digitally signed by ALOK KUMAR Date: 2021.03.25 23:14:28 +05'30'

RNI No. MAHBIL /2009/35530

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ३, अंक ७(३)] बुधवार, जानेवारी ११, २०१७/पौष २१, शके १९३८ [पृष्ठे १२८, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक ११**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

| | |
|---|---|
| **सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६.**—विद्याविषयक स्वायत्तता व अत्युच्च गुणवत्ता, लोकशाही प्रक्रियेद्वारे पर्याप्त प्रतिनिधित्व, उच्च शिक्षणाची अभिवृद्धी, त्याचे बळकटीकरण व विनियमन यांकरिता आणि त्यांच्याशी संबंधित किंवा तदनुषंगिक बाबींकरिता तरतूद करण्यासाठी अधिनियम. .. .. | पृष्ठे १–१२८ |

दिनांक १० जानेवारी २०१७ रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**प्रकाश हिं. माळी,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

---

### सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६.

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात** " दिनांक ११ जानेवारी २०१७ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**विद्याविषयक स्वायत्तता व अत्युच्च गुणवत्ता, लोकशाही प्रक्रियेद्वारे पर्याप्त प्रतिनिधित्व, उच्च शिक्षणाची अभिवृद्धी, त्याचे बळकटीकरण व विनियमन यांकरिता आणि त्यांच्याशी संबंधित किंवा तदनुषंगिक बाबींकरिता तरतूद करण्यासाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र राज्यातील कृषीतर व वैद्यकेतर विद्यापीठांना विद्याविषयक स्वायत्तता देणे आणि त्याकरिता अधिक चांगल्या तरतुदी करणे इष्ट आहे ;

प्रकरण सात

## अध्यापक आणि कर्मचारी यांच्या तक्रारींचे निवारण

तक्रार निवारण समिती.

**७९.** (१) प्रत्येक विद्यापीठामध्ये, राज्य शासन, केंद्र सरकार किंवा स्थानिक प्राधिकरण यांनी व्यवस्थापन केलेल्या व चालविलेल्या संस्थांव्यतिरिक्त, विद्यापीठांचे, संलग्न व स्वायत्त महाविद्यालयांचे आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांचे अध्यापक व इतर कर्मचारी यांच्या, राज्य शासन व त्यांचे अधिकारी यांच्या विरुद्धच्या तक्रारीव्यतिरिक्त, इतर सर्व प्रकारच्या आणि विद्यापीठाच्या व महाविद्यालय न्यायाधिकरणाच्या अधिकारक्षेत्रात येत नाहीत अशा तक्रारींवर कार्यवाही करण्यासाठी एक तक्रार निवारण समिती असेल.

(२) विद्यापीठ, तक्रार निवारण समितीला प्रशासकीय साहाय्य देण्यासाठी सहायक कुलसचिवापेक्षा कमी दर्जाचा नसेल अशा विद्यापीठाच्या अधिकाऱ्याच्या अध्यक्षतेखाली एक तक्रार निवारण कक्ष स्थापन करील ;

(३) तक्रार निवारण समितीमध्ये पुढील सदस्यांचा समावेश असेल :—

(क) कुलगुरुने नामनिर्देशित केलेला, जिल्हा न्यायाधीशाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसेल असा सेवानिवृत न्यायाधीश —अध्यक्ष ;

(ख) कुलगुरुने नामनिर्देशित केलेला एक अधिष्ठाता ;

(ग) कुलपतीने व्यवस्थापन परिषदेवर नामनिर्देशित केलेली व्यक्ती ;

(घ) कुलसचिव ;

(ङ) अधिसभेने आपल्या सदस्यांमधून नामनिर्देशित केलेला, अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमाती किंवा निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती) किंवा भटक्या जमाती किंवा इतर मागासवर्गातील एक अध्यापक आणि एक अध्यापकेतर कर्मचारी ;

(च) विद्यापीठाचा विधि अधिकारी-सदस्य सचिव.

(४) तक्रार निवारण समितीचा अध्यक्ष म्हणून सेवानिवृत्त न्यायाधीशाचे आणि सदस्य म्हणून अधिष्ठात्याचे नामनिर्देशन हे, कुलगुरू प्रत्येक प्रकरणी वेळोवेळी निश्चित करील अशा, एकूण तीन वर्षांपेक्षा अधिक नसेल अशा कालावधीसाठी असेल.

(५) तक्रार निवारण समितीचा अध्यक्ष म्हणून नामनिर्देशित केलेला सेवानिवृत्त न्यायाधीश, विद्यापीठाकडून निश्चित करण्यात येईल असे पारिश्रमिक व वाहनभत्ता मिळण्यास हक्कदार असेल.

(६) तक्रार निवारण समिती व्यवहार्य असेल तेथवर, तक्रार दाखल केल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत कायद्यानुसार तक्रारीची सुनावणी, समझोता करील व त्यावर निर्णय देईल.

(७) दोन्ही पक्षकारांना आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, न्यायाधिकरणाच्या अधिकारक्षेत्रात नसलेल्या कर्मचाऱ्यांच्या सेवेसंबंधीची गाऱ्हाणी किंवा तक्रारी विचारार्थ स्वीकारणे व त्यावर निर्णय देणे हे तक्रार निवारण समितीसाठी कायदेशीर असेल.

विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरण.

**८०.** (१) कलम ८१ च्या पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या बाबीसंदर्भात, या विद्यापीठांचे कर्मचारी आणि त्यांचे संबंधित विद्यापीठ यांच्यामधील आणि राज्य शासन, केंद्र सरकार किंवा स्थानिक प्राधिकरण यांनी व्यवस्थापन केलेल्या व चालविलेल्या संस्था व त्यांचे संबंधित व्यवस्थापन या व्यतिरिक्त, संलग्न किंवा स्वायत्त महाविद्यालये किंवा या विद्यापीठांच्या मान्यताप्राप्त संस्था यांचे कर्मचारी आणि त्यांचे संबंधित व्यवस्थापन यांच्यामधील विवादांच्या अभिनिर्णयासाठी या अधिनियमाद्वारे तसेच महाराष्ट्र कृषि विद्यापीठ अधिनियम, १९८३, महाराष्ट्र पशु आणि मत्स्यव्यवसाय विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ व महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ यांद्वारे नियमित केलेल्या, राज्यातील एक किंवा अधिक विद्यापीठांकरिता एक किंवा अधिक विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरणे असतील.

१९८३ चा महा. ४१. १९९८ चा महा. १७. १९९९ चा महा. १०.

(२) न्यायाधिकरणामध्ये राज्य शासनाने नियुक्त करावयाचा पीठासीन अधिकारी याचा समावेश असेल.

(३) जर एखादी व्यक्ती,—

(क) उच्च न्यायालयाची न्यायाधीश आहे किंवा होती ; किंवा

(ख) उच्च न्यायालयाची न्यायाधीश म्हणून नियुक्ती करण्यास ती अर्हताप्राप्त आहे,

असे असल्याशिवाय न्यायाधिकरणाचा पीठासीन अधिकारी म्हणून नियुक्ती केली जाण्यास अर्हताप्राप्त असणार नाही :

परंतु, खंड (ख) अन्वये नियुक्त करावयाची व्यक्ती ही, मुंबई येथील उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तीने शिफारस केलेल्या तीन व्यक्तींच्या नामिकेमधील असेल.

(४) न्यायाधिकरणाचा पीठासीन अधिकारी म्हणून एखाद्या व्यक्तीची नियुक्ती ही, पूर्णवेळ तत्त्वावर केलेली असेल आणि ती, राज्य शासन, प्रत्येक प्रकरणी, वेळोवेळी निश्चित करील अशा, एकूण तीन वर्षांपेक्षा अधिक नसलेल्या कालावधीसाठी केलेली असेल.

(५) पीठासीन अधिकाऱ्याचे पारिश्रमिक आणि सेवेच्या इतर शर्ती या राज्य शासनाने ठरवून दिल्याप्रमाणे असतील.

(६) विद्यापीठ, या अधिनियमाखालील न्यायाधिकरणाची कामे पार पाडण्यासाठी आवश्यक असेल असा, लिपिकीय कर्मचारीवर्ग न्यायाधिकरणाला उपलब्ध करून देईल.

(७) पीठासीन अधिकाऱ्यास व त्याच्या दिमतीला असलेल्या कर्मचारीवर्गास अनुज्ञेय असलेले पारिश्रमिक, निवृत्तीवेतन, भविष्यनिर्वाह निधी, अंशदान, रजा भत्ता आणि इतर भत्ते व सोयी यांसाठी होणारा सर्व खर्च हा, राज्य शासनाकडून आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करता येईल अशा प्रमाणात विद्यापीठाकडून किंवा विद्यापीठांकडून भागविण्यात येईल.

(८) पीठासीन अधिकाऱ्यास, आपल्या स्वाक्षरीने आपल्या पदाचा लेखी राजीनामा देता येईल आणि राज्य शासनाने त्याचा राजीनामा स्वीकारल्यानंतर किंवा राजीनामा दिल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांचा कालावधी समाप्त झाल्याच्या दिनांकापासून, यापैकी जे आधी घडेल तेव्हापासून, त्याने पद धारण करणे बंद होईल.

(९) न्यायाधिकरणाच्या पीठासीन अधिकाऱ्याचे पद तात्पुरते रिक्त होईल ते खेरीजकरून एरव्ही, ते पद रिक्त झाल्यास, राज्य शासन, शक्य तितक्या लवकर, परंतु, कोणत्याही परिस्थितीत तीन महिन्यांच्या आत, असे रिक्त पद भरण्यासाठी दुसऱ्या अर्हताप्राप्त व्यक्तीची नियुक्ती करील. तात्पुरत्या रिक्त पदाच्या बाबतीत, राज्य शासनास, पीठासीन अधिकारी परत कामावर रुजू होईपर्यंत इतर न्यायाधिकरणाच्या पीठासीन अधिकाऱ्याकडे त्याचा प्रभार देता येईल. पूर्वीच्या पीठासीन अधिकाऱ्यासमोर प्रलंबित असेल असे कोणतेही कामकाज, त्याच्या उत्तराधिकाऱ्यास पद रिक्त झाले तेव्हा, ते कामकाज ज्या टप्प्यापर्यंत आले होते तेथून पुढे चालू ठेवता येईल व निकालात काढता येईल.

**८१.** (१) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात किंवा संविदेत काहीही अंतर्भूत असले तरी,— अपील करण्याचा अधिकार.

(क) ज्याला विद्यापीठाने किंवा व्यवस्थापनाने बडतर्फ केले असेल किंवा पदावरून काढून टाकले असेल किंवा अन्यथा ज्याची सेवा समाप्त केली असेल किंवा ज्याला सक्तीने सेवानिवृत्त केले असेल किंवा ज्याला पदावनत केले असेल आणि जो व्यथित झाला असेल ; किंवा

(ख) जो या अधिनियमान्वये स्थापन केलेल्या तक्रार निवारण समितीच्या निर्णयाने व्यथित झाला असेल ;

अशा राज्य शासनाकडून, केंद्र सरकारकडून किंवा स्थानिक प्राधिकरणाकडून व्यवस्थापन करण्यात आणि चालविण्यात येत असेल असे महाविद्यालय किंवा परिसंस्था वगळता, या अधिनियमान्वये नियमन केलेल्या कोणत्याही विद्यापीठातील किंवा इतर कोणत्याही विद्यापीठाच्या संलग्न महाविद्यालयातील किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेतील कोणत्याही अध्यापक किंवा अन्य कर्मचारी यास वरील अपील करण्याचा हक्क असेल व अशा कोणत्याही आदेशावरील अपील न्यायाधिकरणाकडे दाखल करण्यात येईल :

परंतु, एखाद्या बाबीचा निर्णय, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकाला न्यायालयाकडून किंवा न्यायाधिकरणाकडून आधीच करण्यात आला असेल किंवा ती बाब अशा न्यायालयासमोर किंवा न्यायाधिकरणासमोर प्रलंबित असेल किंवा हा अधिनियम अंमलात येण्याच्या दिनांकापूर्वी कोणत्याही वेळी बडतर्फीचा, पदावरून काढून टाकण्याचा, अन्यथा सेवासमाप्तीचा, सक्तीच्या सेवानिवृत्तीचा किंवा पदावनतीचा आदेश किंवा तक्रार निवारण समितीचा निर्णय देण्यात आला असेल आणि ज्या बाबतीत अपील दाखल करण्याची मुदत टळून गेली असेल अशा कोणत्याही प्रकरणी असे कोणतेही अपील न्यायाधिकरणाकडे दाखल करता येणार नाही.

(२) कर्मचाऱ्यांस, बडतर्फीचा, पदावरून काढून टाकण्याचा, अन्यथा सेवा समाप्तीचा, सक्तीच्या सेवानिवृत्तीचा किंवा पदावनतीचा आदेश किंवा यथास्थिति, तक्रार निवारण समितीचा निर्णय मिळाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत त्यास न्यायाधिकरणाकडे असे अपील दाखल करता येईल :

परंतु, असा आदेश, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी देण्यात आला असेल त्याबाबतीत, असा आदेश किंवा निर्णय मिळाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांची मुदत समाप्त झाली नसेल तर, असे अपील करता येईल.

(३) पोट-कलम (२) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही, तीस दिवसांच्या उक्त मुदतीत अपील दाखल न करण्यास, अपीलकारास पुरेसे कारण होते याबद्दल, न्यायाधिकरणाची खात्री पटल्यास, न्यायाधिकरणास, त्याच्याकडे उक्त मुदतीनंतर करण्यात आलेले अपील दाखल करून घेता येईल.

(४) प्रत्येक अपिलासोबत विहित करण्यात आलेले शुल्क भरण्यात येईल. ते शुल्क परत करण्याजोगे असणार नाही व ते विद्यापीठ निधीमध्ये जमा करण्यात येईल :

परंतु, राज्य शासनाने **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, वेळोवेळी त्यास योग्य वाटेल अशी शुल्कामध्ये सुधारणा करणे कायदेशीर असेल.

न्यायाधिकरणाचे सर्वसाधारण अधिकार व कार्यपद्धती.

**८२.** (१) अपिलांची सुनावणी करण्याच्या आणि ती निकालात काढण्याच्या प्रयोजनांसाठी न्यायाधिकरणास, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ अन्वये अपील न्यायालयाकडे जे अधिकार निहित केलेले असतात तसेच अधिकार असतील व त्यास, ज्याविरूद्ध अपील करण्यात आले असेल त्या कोणत्याही आदेशाची अंमलबजावणी, त्यास लादणे योग्य वाटेल अशा शर्तीवर तहकूब करण्याचा देखील अधिकार असेल. तसेच या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये त्याला प्रदान करण्यात आले असतील असे इतर अधिकार असतील. १९०८ चा ५.

(२) न्यायाधिकरणाचा पीठासीन अधिकारी, न्यायाधिकरणाने आपले काम चालविण्यासाठी अनुसरावयाची कार्यपद्धती तसेच, ज्या ठिकाणी व ज्यावेळी ते आपल्या बैठकी घेईल ते ठिकाण किंवा ठिकाणे व वेळ निश्चित करील.

(३) प्रत्येक अपिलाचा निर्णय, शक्य तितक्या लवकर करण्यात येईल. न्यायाधिकरण प्रत्येक प्रकरणी, त्यास अपील मिळाल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत अपिलावर निर्णय घेण्याचा आटोकाट प्रयत्न करील. या कालावधीमध्ये एखादे अपील निकालात काढणे न्यायाधिकरणास शक्य झाले नाही तर, त्याबद्दलची कारणे न्यायाधिकरण आपल्या अभिलेखांमध्ये नमूद करून ठेवील.

उचित अनुतोष व निदेश देण्याचे न्यायाधिकरणाचे अधिकार.

**८३.** (१) एखादे अपील मिळाल्यावर, दोन्ही पक्षकारांना आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, ते अपील कलम ८० च्या पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या बाबींपैकी कोणत्याही बाबींशी संबंधित नाही, किंवा त्याने चालविण्यायोग्य नाही किंवा विद्यापीठाच्या किंवा व्यवस्थापनाच्या आदेशांमध्ये किंवा तक्रार निवारण समितीच्या निर्णयामध्ये हस्तक्षेप करण्यास पुरेसे कारण नाही याबाबत न्यायाधिकरणाची खात्री पटल्यास, त्यास ते अपील फेटाळता येईल.

(२) दोन्ही पक्षकारांस आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर किंवा एखाद्या अपिलाबाबत, बडतर्फीचा, पदावरून काढून टाकण्याचा, अन्यथा सेवा समाप्त करण्याचा, सक्तीच्या सेवानिवृत्तीचा किंवा पदावनतीचा आदेश किंवा तक्रार निवारण समितीचा निर्णय यामुळे त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याच्या, संविदेच्या किंवा सेवेच्या शर्तीचे उल्लघंन झाले होते किंवा अन्यथा तो आदेश किंवा निर्णय अवैध किंवा अयोग्य होता, असा निर्णय न्यायाधिकरणाने दिला तर, न्यायाधिकरणास, यथास्थिति, विद्यापीठाचा किंवा व्यवस्थापनाचा आदेश किंवा यथास्थिति, तक्रार निवारण समितीचा निर्णय अंशतः किंवा पूर्णतः रद्द करता येईल व विद्यापीठास किंवा व्यवस्थापनास पुढील निदेश देता येईल,—

(क) कर्मचाऱ्यास पुन्हा त्या पदावर किंवा न्यायाधिकरण विनिर्दिष्ट करील अशा खालच्या पदावर पुन्हा नेमणे ;

(ख) कर्मचाऱ्यास, त्याने पदावनतीपूर्वी धारण केलेला दर्जा किंवा न्यायाधिकरण विनिर्दिष्ट करील असा कोणताही खालचा दर्जा प्राप्त करून देणे ;

(ग) न्यायाधिकरण विनिर्दिष्ट करील अशा कालावधीच्या वित्तलब्धीची थकबाकी, देय रकमा व इतर आर्थिक लाभ कर्मचाऱ्यास देणे ;

(घ) बडतर्फी, पदावरून काढून टाकणे, अन्यथा सेवा समाप्त करणे, सक्तीची सेवासमाप्ती किंवा यथास्थिति, पदावनती याऐवजी न्यायाधिकरण विनिर्दिष्ट करील अशी त्यापेक्षा कमी शिक्षा देणे ;

महाराष्ट्र शासन
तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४५०, ४४२, ४४३
ई-मेल — desk2@dtemaharashtra.gov.in वेबसाईट : http://www.dtemaharashtra.gov.in

क्र. २/एनजीसी/तक्रार निवारण समिती/२०२३/ ७१७, दिनांक : - 5 SEP 2023

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
अमरावती/औरंगाबाद/नागपूर/
नाशिक/पुणे/मुंबई

विषय : शैक्षणिक संस्था स्तरावर स्थापन करण्यात येणा-या तक्रार निवारण समितीमध्ये विद्यापीठ किंवा तंत्र शिक्षण संचालनालयाचा प्रतिनिधीच्या नामनिर्देशनाबाबत....

संदर्भ : ऑल इंडिया कौंसिल ऑफ टेक्नीकल एज्युकेशन (रिड्रेसल ऑफ फॅकल्टी/स्टाफ मेंबर) रेग्युलेशन, २०२१

तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील राज्यातील सार्वजनिक विद्यापीठांशी संलग्नीत असलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या विनाअनुदानित शैक्षणिक संस्थेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचेकडून सेवा विषयक बाबी संदर्भात या संचालनालयास तक्रारी प्राप्त होतात. या तक्रारी साधारणत: वेतन न मिळणे, वेतन कमी मिळणे, उपदान व रजारोखीकरण रक्कम न मिळणे, सेवापुस्तक, वेतन चिठ्ठी न मिळणे, आयकर प्रमाणपत्र न मिळणे, वरिष्ठांकडून त्रास, नोकरीतून काढून टाकणे इत्यादी स्वरुपाच्या असतात. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील तरतुदीनुसार विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर पदभरतीस मान्यता, सेवाशर्ती, नियुक्तीस मान्यता, वित्तलब्धी, सेवानिवृत्तीलाभ व तद्अनुषंगिक इतर लाभ इ. बाबी विद्यापीठाच्या प्राधिकारात येतात. करीता यावरील तक्रारींबाबतची कार्यवाही सुध्दा विद्यापीठाच्या अधिकार कक्षेत येते.

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली च्या (Redressal of Grievance of Faculty/Staff Member) Regulation, २०२१, नुसार विनाअनुदानित तत्वावर सुरु असलेल्या महाविद्यालयामध्ये तक्रार निवारण समिती स्थापन करण्यास सूचित केले आहे. संदर्भीन अधिनियमामध्ये तक्रार निवारण समितीची रचना नमूद असून या समितीध्ये १ सदस्य विद्यापीठ किंवा तंत्र शिक्षण संचालनालयाने नामनिर्देशित केलेला आहे. संस्था स्तरावरील तक्रारींमध्ये बहुतांश तक्रारी कार्यरत शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे सेवाविषयक बाबींसंदर्भात असतात. सदर तक्रारींच्या मुळ मुद्यांबाबतचे नियम, तरतूदी या विद्यापीठाकडून अधिसूचित करण्यात येतात. तसेच तक्रार निवारण समितीच्या निर्णयाच्या अनुषंगाने अपिल विद्यापीठ व महाविद्यालयीन न्यायाधिकरणाकडे करण्यात येत असल्याने संस्था स्तरावरील तक्रार निवारण समितीमध्ये विद्यापीठ प्रतिनिधी असणे न्यायोचीत ठरेल. करीता, संस्थेच्या तक्रार निवारण समितीमध्ये विद्यापीठ प्रतिनिधी घेण्यास आपले स्तरावरुन संस्थांना कळविण्यात यावे.

येथे असेही नमूद करण्यात येते की, आपल्या विभागाच्या कार्यक्षेत्रातील संस्थांनी संदर्भीन अधिसूचनेद्वारे निर्देशित केलेली तक्रार निवारण समिती स्थापन केली आहे किंवा कसे? याबाबत आढावा आपले स्तरावरुन घेण्यात यावा. आपण घेतलेल्या आढाव्यानुसार ज्या संस्थानी संदर्भीन अधिसूचनेद्वारे निर्देशित केलेली तक्रार निवारण समिती गठित केली नसेल अशा संस्थांना सदर समिती गठित करण्यास आपले स्तरावरुन सूचित करण्यात यावे. तसेच संस्थास्तरावरील तक्रार निवारण समितीने केलेल्या कार्यवाहीबाबतचा नियमित त्रैमासिक आढावा आपले स्तरावरुन घेण्यात यावा.

(डॉ. विनोद मोहितकर)
संचालक,
तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई